महाराष्ट्र शासन

# एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय,

महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई

(महिला व बाल विकास विभाग)

कार्यालयाचा पत्ता :- रायगड भवन, रिअर विंग, पहिला मजला, सी.बी.डी. बेलापूर- ४०० ६१४

*Email- comicdsraigadbhavan@gmail.com* दुरध्वनी क्र.-०२२-२७५७६३८८,३२२,३२३ Fax-०२२-२७५७६३२४

जा.क्र. एबाविसेयो/का-७/ FRP-Toilet /२०२५/ ५२० नवी मुंबई दिनांक-३१ /०१/२०२५

## पुरवठा आदेश

**विषय :- एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत राज्यातील ९६६४ अंगणवाडी केंद्रांपैकी ३२२१ अंगणवाडी केंद्रांना "Fiber-reinforced polymer (FRP) Toilet" शौचालय पुरवठा, उभारणी व soak pit आस्थापित करणेसाठी मे. माविन अधेसिव्ह प्रा.लि., पुणे या पुरवठाधारकास कार्यादेश निर्गमित करणेबाबत..**

संदर्भ :- १) शासन पत्र क्र. एबावि-२०२४/प्र.क्र.१४९/का-६ दि. ११/१०/२०२४

२) या कार्यालयाचे पत्र क्र.एबाविसेयो/का-७/FRP-Toilet /२०२४/नागपूर कॅम्प/२५ दि.१८/१२/२०२४

३) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. एबावि-२०२४/प्र.क्र. १४९/का-६ दि. २९/०१/२०२५

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत स्वमालकीच्या इमारतीतील शौचालय सुविधा उपलब्ध नसणाऱ्या अंगणवाडी केंद्रांना प्रति शौचालय रु. ३६०००/- या मर्यादेत शौचालय बांधकामाकरिता निधी अनुज्ञेय केलेला आहे. सदर निधीच्या मर्यादेत ९६६४ अंगणवाडी केंद्रामध्ये Fiber-reinforced polymer (FRP) Toilet तंत्रज्ञानाचा वापर करुन शौचालय उभारणी करणेसाठी निविदा प्रकाशित करण्यास व निविदा मसूद्यास (अटी शर्तीसह) शासनाने संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये मान्यता दिली होती. त्याअनुसार या कार्यालयामार्फत महाटेंडर संकेतस्थळावर दि. १४/१०/२०२४ रोजी ई-निविदा प्रकाशित करण्यात आली होती. सदर निविदा प्रक्रियेअंती प्रति शौचालय रु ३५,९५३/- या L१ दरानुसार पात्र निविदाधारकांकडून साहित्याचा पुरवठा व उभारणी करणेस मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव संदर्भ क्र. २ अन्वये शासनास सादर करण्यात आला होता.

त्याअनुषंगाने शासनाने संदर्भ क्र. ३ येथील दि. २९/०१/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत ९६६४ अंगणवाडी केंद्रांमध्ये Fiber-Reinforced Polymer (FRP) Toilet चा खालील पात्र निविदाधारकांकडून पुरवठा व उभारणी करण्यास व त्याकरिता येणाऱ्या एकुण **रुपये ३४,७४,४९,७९२/- (रुपये चौतीस कोटी चौऱ्याहत्तर लाख एकोणपन्नास हजार सातशे ब्यान्नव फक्त) (सर्व करासहित)** एवढया खर्चास शासनाने मान्यता दिलेली आहे.

| अ. क्र. | L१ निविदा-धारकांचे नांव | साहित्याचे नांव | अंगणवाडी केंद्राची संख्या | FRP-Toilet पुरवठयाची एकुण संख्या | प्रति संच किंमत रुपये (सर्व करासहित) | एकुण खरेदीची किंमत रुपये (सर्व करासहित) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे. क्रांती ग्लास फायबर इंडस्ट्रिज, पुणे | Fiber-Reinforce | ३२२२ | ३२२२ | ३५,९५३ | ११५८४०५६६ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | मे. माविन अधेसिव्ह प्रा.लि., पुणे | d Polymer (FRP) Toilet | ३२२१ | ३२२१ | ३५,९५३ | ११५८०४६१३ |
| ३ | मे. झिरो डि इन्डस्ट्रिज प्रा. लि, लातूर | | ३२२१ | ३२२१ | ३५,९५३ | ११५८०४६१३ |
| | **एकुण** | | **९६६४** | **९६६४** | **३५,९५३** | **३४,७४,४९,७९२** |

**रु. ३४,७४,४९,७९२/-(अक्षरी रुपये चौतीस कोटी चौऱ्याहत्तर लाख एकोणपन्नास हजार सातशे ब्यान्नव फक्त)**

दि. २९/०१/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासनाने दिलेल्या मान्यतेच्या अधीन राहून सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात ९६६४ अंगणवाडी केंद्रांपैकी **या कार्यादेशान्वये ३२२१ अंगणवाडी केंद्रांना प्रति शौचालय पुरवठा व उभारणी करणेसाठी रुपये ३५,९५३/- या दराने एकुण रु. ११,५८,०४,६१३/- (अक्षरी रुपये अकरा कोटी अठ्ठावन्न लाख चार हजार सहाशे तेरा फक्त) (सर्व करासहित)** एवढया रक्कमेचा सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील जिल्हानिहाय अंगणवाडी केंद्र संख्येनुसार Fiber-Reinforced Polymer (FRP) Toilet तंत्रज्ञानाचा वापर करुन ३२२१ शौचालय पुरवठा, उभारणी व soak pit आस्थापित करणेकरिता **मे. माविन अधेसिव्ह प्रा.लि., पुणे या पुरवठाधारकास** आदेशात नमुद अटी व शर्तीच्या अधीन राहून पुरवठा करणे व उभारणी करण्यास आदेशीत करण्यात येत आहे.

**निविदेत नमुद केल्यानुसार खालील स्पेसीफिकेशन्सनुसार “Fiber-Reinforced Polymer (FRP) Toilet” तंत्रज्ञानाचा वापर करुन शौचालयाचा पुरवठा, उभारणी व soak pit आस्थापित करणे मे. माविन अधेसिव्ह प्रा.लि., पुणे या पुरवठाधारकास बंधनकारक राहील.**

| अ.क्र. | Brief Technical Specifications of FRP WC unit | नग संख्या |
|---|---|---|
| 1 | Size of the unit: Inner clear dimensions should be 3’X3’X6’ + (LXWXH) Indian style FRP 450 Grade molded WC Pan to avoid recurring expenses on ceramic/porcelain. Unit should be comfortable for children’s as well as for their teacher for their inside movement.<br>Material: FRP (Fiberglass reinforced plastic). Entire Unit will be in FRP molded, self-pigmented color and body shell will one piece to avoid leakages, with inbuilt stiffeners to give more strength to the unit. outside finish, duly reinforced by structural material and overall wall thickness will be 4mm + and from inside semi finish with surface mat coating. Strong MS base frame should be integrated and reinforced at the bottom to make the unit totally strong and sturdy. Inner floor base will also be molded FRP anti-skid and specially designed MS plate with hole will be provided and fixing at ground at location point.<br>Adequate ventilation should be provided to the unit by way in built louver at three sides. WC unit should be provided with all internal plumbing, 1 no Tap, Electrical holder point.<br>**For site installation of the unit**<br>WC unit should be provided with PVC pipe at outside for joining to the pit/soak pit. Necessary lead/cover molded in FRP with small vent pipe will be provided to avoid smell inside the WC unit. | 1 |

| | | |
|---|---|---|
| | Baby friendly should be installed with the concrete base and proper fitting at anganwadi level. Including making of soak pit.<br>Social slogans/funny cartoons stickers will be fixed on units to give more aesthetic look. Toilets should be manufactured and designed in such way that children can use comfortably, well ventilated, and hygienic for prolonged use. The toilets should be molded/fabricated maintaining the highest structural stability, leak proof, weather proof, strong and sturdy.<br>American Society for Testing and Materials (ASTM) standard is mandatory while fabrication and installation for FRP baby friendly Toilets. | |

**खालील अटी शर्तीनुसार "Fiber-Reinforced Polymer (FRP) Toilet" तंत्रज्ञानाचा वापर करुन शौचालयाचा पुरवठा, उभारणी व soak pit आस्थापित करणे संबधित पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.**

१. **"Fiber-Reinforced Polymer (FRP) Toilet"** साठी प्रकाशित ई-निविदेतील सर्व अटी शर्ती तसेच संदर्भ क्र. ३ येथील दि. २९/१/२०२५ रोजीच्या शासन निर्णयात नमुद सर्व अटी शर्तीनुसार पुरवठा करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहतील.

२. ई-निविदेत नमुद Specification व अटी शर्तीनुसारच अंगणवाडी केंद्रस्तरावर "Fiber-Reinforced Polymer (FRP) Toilet" तंत्रज्ञानाचा वापर करुन शौचालयाचा पुरवठा, उभारणी व soak pit आस्थापित करणे बंधनकारक राहील.

३. सोबत जोडलेल्या विवरण पत्रातील जिल्हयांमधील अंगणवाडी केंद्राची निवड संबधित जिल्हयांचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी, (मबावि), जिल्हा परिषद यांचेमार्फत करण्यात आलेली असल्याने पुरवठाधारकाने पुरवठा आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत संबधित जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांचेशी संपर्क साधून "Fiber-Reinforced Polymer (FRP) Toilet" पुरवठयासाठी स्वमालकीच्या शौचालय सुविधा उपलब्ध नसलेल्या अंगणवाडी केंद्राची यादी जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबावि) जिल्हा परिषद यांचेकडून प्राप्त करुन घेणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

४. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात जिल्हास्तरावरुन प्राप्त झालेल्या अंगणवाडी केंद्राच्या यादीनुसार त्या अंगणवाडी केंद्रामध्ये "Fiber-Reinforced Polymer (FRP) Toilet" तंत्रज्ञानाचा वापर करुन शौचालयाचा पुरवठा, उभारणी व soak pit आस्थापित करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

५. निविदेतील अटी शर्तीनुसार सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील ९६६४ अंगणवाडी केंद्रांपैकी ३२२१ अंगणवाडी केंद्रांमध्ये "Fiber-Reinforced Polymer (FRP) Toilet" तंत्रज्ञानाचा वापर करुन शौचालयाचा पुरवठा, उभारणी व soak pit आस्थापित करणे इ. सर्व कामकाज अंगणवाडीस्तरावर, निविदेत नमुद केल्याप्रमाणे १८० दिवसांच्या आत म्हणजेच **दि. २९/०७/२०२५ पुर्वी** पुर्ण करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

६. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. १ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातील खरेदी धोरणातील तरतुदीचे तसेच वेळोवेळी शासनस्तरावरुन निर्गमित आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

७. संबधित पुरवठाधारकाने निविदेसोबत "Fiber-Reinforced Polymer (FRP) Toilet" जो नमुना सादर केलेला आहे त्याच नमुन्यानुसार अंगणवाडी स्तरावर शौचालय पुरवठा, उभारणी व soak pit आस्थापित करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

८. पुरवठा आदेश प्राप्त झाल्यानंतर ५०० रुपयांचे स्टॅम्प पेपरवर राज्यस्तरीय करारनामा करण्यात यावा. तसेच संबधित जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबावि), जिल्हा परिषद यांचेस्तरावर त्यांचे अधिनस्त प्रकल्पातील एकुण अंगणवाडी केंद्र संख्येनुसार स्वतंत्र करारनामा करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

९. "Fiber-Reinforced Polymer (FRP) Toilet" च्या एकुण खरेदी रक्कमेच्या ३% म्हणजेच **रु.३४,७४,१३८/-** एवढी रक्कम सुरक्षा अनामत (**Performance Security Deposit)** म्हणून राष्ट्रीयकृत बँक / शेडयुल्ड बँकेची ACCOUNTS OFFICER, INTEGRATED CHILD DEVELOPMENT SERVICE SCHEME, MAHARASHTRA STATE, NAVI MUMBAI यांच्या नांवे असलेली बँक गॅरन्टी तात्काळ या कार्यालयाकडे पुरवठा आदेशाच्या दिनांकानंतर ७ दिवसांच्या आत सादर करणे बंधनकारक राहील. सदरची बँक गॅरन्टी एक वर्ष कालावधीसाठी वैध असणे आवश्यक राहील. सदर कालावधीत कोणतिही तक्रार प्राप्त न झाल्यास इंडेम्निटी बाँड घेऊन अनामत रक्कम परत करण्यात येईल.

१०. दि. २९/०१/२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील अट क्र. २ मध्ये नमुद केल्याप्रमाणे उपरोक्त नमुद दर पुढील १ वर्ष कालावधीसाठी लागू राहतील. त्यानुसार निविदाधारकाकडून केंद्र शासनाकडून मंजुर निधीच्या मर्यादेत FRP Toilet साहित्य खरेदी करण्याकरिता शासनाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

११. निविदेतील अटी शर्तीनुसार सदरच्या साहित्य पुरवठयाचे आदेश प्राप्त झाल्यापासुन आदेशात नमुद केल्यानुसार "Fiber-Reinforced Polymer (FRP) Toilet" तंत्रज्ञानाचा वापर करुन शौचालयाचा पुरवठा, उभारणी व soak pit आस्थापित करणेसाठीचे संपुर्ण कामकाज १८० दिवसांच्या आत प्राधान्यक्रमाने करणे आवश्यक आहे. तसेच विशिष्ट परिस्थितीत म्हणजेच कोवीड सारखी संसर्गजन्य रोगाची परिस्थिती, वाहतुकीचा संप, भुकंप, ज्वालामुखी, अतिवृष्टी इ. आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास पुरवठा कालावधीत वाढ करण्याचे (मुदतवाढ) अधिकार आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय, रायगड भवन, बेलापुर, नवी मुंबई यांना राहतील.

१२. सदर पुरवठा करतांना प्रत्येक साहित्यावर **"एबाविसेयो अंतर्गत वापरासाठी/शासनामार्फत पुरवठा"** असा शिक्का किंवा लेबल लावणे बंधनकारक आहे.

१३. "Fiber-Reinforced Polymer (FRP) Toilet" खराब अथवा नादुरुस्त असल्यास तसेच साहित्याच्या दर्जाबाबत काही तक्रार असल्यास १५ कार्यालयीन दिवसात बदलून देणे संबधित पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

१४. "Fiber-Reinforced Polymer (FRP) Toilet" पुरवठा, उभारणी व soak pit आस्थापित करणे साठीच्या कामकाजामध्ये अनियमितता झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी पुरवठाधारकावर राहील.

१५. निविदेत नमुद पुरवठा कालावधीमध्ये "Fiber-Reinforced Polymer (FRP) Toilet" चा पुरवठा न झाल्यास विलंबाने पुरवठा झालेल्या मालाच्या किंमतीवर ०.५% प्रती आठवडा प्रमाणे दंड आकारला जाईल व त्याची कमाल मर्यादा खालील प्रमाणे-

अ) पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा न केलेल्या साहित्याची किंमत दोन लाखा पेक्षा कमी असेल तर अशा साहित्याच्या किंमतीच्या १० % दंड .

ब) पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत दोन लाखापेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या ५% दंड,

१६. या कार्यालयामार्फत क्षेत्रीय स्तरावरुन अचानकपणे सदर साहित्याचा नमुना घेऊन उद्योग ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. १/१२/२०१६ रोजीच्या खरेदी धोरणातील ६.१२ परिशिष्ट-१२ मध्ये नमुद प्रयोगशाळेकडे तपासणी करिता (Specification प्रमाणे आहे किंवा कसे) पाठविण्यात येईल. याबाबतचे प्रयोशाळेमार्फत प्राप्त देयकाची रक्कम पुरवठाधारकाने अदा करणे बंधनकारक राहील. तसेच प्रयोगशाळेच्या अहवालानुसार Specification मध्ये विसंगती दिसून आल्यास सदर साहित्याची संपुर्ण बॅच तात्काळ विहित मुदतीत बदलून देणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. यासाठी कोणताही अतिरिक्त खर्च झाल्यास तो या कार्यालयामार्फत अदा करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

१७. निविदेतील अटी शर्तीनुसार "Fiber-Reinforced Polymer (FRP) Toilet" पुरवठया संदर्भातील देयकांची अदायगी खालील कार्यपध्दतीनुसार करण्यात येईल.

१८. पुरवठा आदेश मिळाल्यापासून विहित केलेल्या कालावधीत नमुन्यानुसार साहित्याचा पुरवठा, आदेशीत केलेल्या प्रकल्पातील अंगणवाडी स्तरावर पोहोच व आस्थापित (Install) करावेत. अंगणवाडी स्तरावर साहित्य पुरवठा व शौचालय आस्थापित केल्यानंतर सदर अंगणवाडी केंद्रातील अंगणवाडी सेविकांची पोहोच घेण्यात यावी. सदरची पोहोच व काम पुर्णत्वाचा दाखला संबधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे कार्यालयात जमा करुन सदर प्रकल्प कार्यालयामार्फत अधिनस्त स्वमालकीच्या अंगणवाडी केंद्रांमध्ये पुरवठा आदेशात नमुद असलेल्या वर्णनाप्रमाणे साहित्य प्राप्त झाले व त्याची नोंद साठा नोंदवही मध्ये घेतली असल्याबाबतची पोहोच पावती (झेरॉक्स प्रत ग्राहय धरली जाणार नाही), बाल विकास प्रकल्प अधिकारी/अधिकृत प्रतिनिधी यांच्या स्वाक्षरीने एकच डिलेव्हरी चलन या कार्यालयास सादर करावे. त्याशिवाय देयकाची रक्कम अदा केली जाणार नाही. वरीलप्रमाणे अंगणवाडी स्तरावर FRP शौचालयाचा पुरवठा व आस्थापित (Install) केल्याचे काम पूर्ण केलेबाबतचे संबंधीत बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे मुळ डिलेव्हरी चलन व संबधित जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबावि), जि.प. यांचे शौचालयाचा पुरवठा व आस्थापित (Install) झाल्याबाबतचे एकत्रित प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर एकूण निविदा रकमेच्या ९०% इतकी रक्कम संबधित पुरवठाधारकास अदा करण्यात येईल. त्यानंतर पुढील ३ महिन्यांच्या कालावधीत कामकाज समाधानकारक असल्याबाबत संबंधीत जिल्हयाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबावि) यांचे अधिनस्त सर्व बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांचे एकत्रित प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर आदेशातील उर्वरित १०% इतकी रक्कम पुरवठाधारकास अदा करण्यात येईल.

१९. निविदेत सर्व करांसह शौचालयाचे दर मागविले आहेत. त्यामुळे पुरवठाधारकाने साहित्य पोहोच केल्यानंतर या कार्यालयास देयक सादर करताना विक्रीकर विभागाच्या GST प्रणालीच्या नियमानुसार सर्व वस्तूंचे दर विविध GST टक्केवारी व HSN CODE सह देयकात नमुद करुन जिल्हयातील सर्व

प्रकल्पांतील अंगणवाडी केंद्राचे एकच Tax Invoice एकुण ६ प्रतीत सादर करावीत. जिल्हानिहाय प्राप्त झालेल्या देयकांची अदायगीची कार्यवाही निविदेत नमुद कार्यपध्दतीनुसार करण्यात येईल.

उपरोक्त नमुद अटी शर्तीनुसार विहित कालावधीत सुस्थितीत ३२२१ अंगणवाडी केंद्रांमध्ये "Fiber-Reinforced Polymer (FRP) Toilet" तंत्रज्ञानाचा वापर करुन शौचालयाचा पुरवठा, उभारणी व soak pit आस्थापित करणेसाठीचे संपुर्ण कामकाज निविदेत नमुद केल्याप्रमाणे १८० दिवसाच्या आत म्हणजेच दि. २९/०७/२०२५ पुर्वी अंगणवाडी स्तरावर करणे बंधनकारक राहील.

सोबत:- "Fiber-Reinforced Polymer (FRP) Toilet"
पुरवठा करावयाच्या जिल्हानिहाय अंगणवाडी
संख्येचे विवरणपत्र

(कैलास पगारे, भाप्रसे)
आयुक्त,
एकात्मिक बाल विकास सेवा योजना,
महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई

प्रति,
**मे. माविन अधेसिव्ह प्रा.लि.,**
**९८/A-२२, हडपसर इंडस्ट्रियल इस्टेट,**
**पी. बी. नं. १२२६, पुणे-४११ ०१३**

प्रतिलिपी,

१) मा. सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर,
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद-----------------(सर्व) यांनामाहितीसाठी
३) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे
४) अप्पर कोषागार अधिकारी, कोकणभवन, बेलापूर, नवी मुंबई यांना माहिती तथा उचित कार्यवाहीसाठी
५) सहा. संचालक (वित्त व लेखा), एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांना उचित कार्यवाहीसाठी
६) **संबधित जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबावि)**- यांनी त्यांचे जिल्हयातील स्वमालकीच्या ज्या अंगणवाडी केंद्राना शौचालय सुविधा उपलब्ध नाही, त्या अंगणवाडी केंद्राची जिल्हानिहाय संख्यात्मक माहिती यापूर्वी आयुक्तालयास सादर केलेली आहे, त्याच अंगणवाडी केंद्रामध्ये Reinforced Polymer (FRP) Toilet" तंत्रज्ञानाचा वापर करुन शौचालयाचा पुरवठा व उभारणी करावयाची असल्याने संबधित जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांनी त्या अंगणवाडी केंद्रांचे नाव व पत्त्यासह यादी प्रकल्पस्तरावरुन प्राप्त करुन घेऊन संबधित पुरवठाधारक यांना जिल्हयाचे नांव, एकुण प्रकल्पांची संख्या, प्रकल्पनिहाय शौचालय पुरवठा करावयाच्या स्वमालकीच्या (शौचालय सुविधा नसलेल्या) अंगणवाडी केंद्राची संख्या व अंगणवाडी केंद्राची यादी प्रकल्पनिहाय एकत्रित यादी तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावी. सदरचे पुरवठा आदेश संबधित ग्रामीण/आदिवासी प्रकल्पांना आपल्या स्तरावरुन पाठविण्यात यावेत तसेच या योजनेवर संनियंत्रण ठेवण्यात यावे.

   **आयुक्तालय स्तरावरुन संबधित पुरवठाधारकासोबत राज्यस्तरीय करारनामा करण्यात येणार आहे, तथापी, प्रत्येक जिल्हयाने जिल्हास्तरावर जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांनी संबधित पुरवठाधारकासोबत स्वतंत्र करारनामा करावा व त्यामध्ये जिल्हयाचे नांव,एकुण प्रकल्पांची संख्या, प्रकल्पनिहाय अंगणवाडी केंद्राची संख्या व अंगणवाडी केंद्राची यादी करारनाम्यासोबत जोडावी. करारनामाचा प्रारुप मसूदा या आयुक्तालयामार्फत आपणास उपलब्ध करुन देण्यात येईल.**
७) **संबधित बाल विकास प्रकल्प अधिकारी- (ग्रामीण / आदिवासी)**- आपल्या प्रकल्पातील ज्या स्वमालकीच्या अंगणवाडी केंद्रामध्ये शौचालय उपलब्ध नाही अशा अंगणवाडी केंद्रामध्ये "Fiber-Reinforced Polymer (FRP) Toilet" तंत्रज्ञानाचा वापर करुन शौचालयाचा पुरवठा व आस्थापित करणेसाठीचे संपुर्ण कामकाज करावयाचे असल्यामुळे सदर अंगणवाडी केंद्रामध्ये वरील स्पेसीफिकेशन्सनुसार अंगणवाडी स्तरावर शौचालयाचा पुरवठा व उभारणी आणि **soak pit** आस्थापित झाल्याची खात्री करुन साहित्य सुस्थितीत प्राप्त झाल्याबाबत प्रमाणित करण्यात यावे. तसेच सदर अंगणवाडी केंद्रामध्ये शौचालय उभारणीचे कामकाज करुन सुस्थितीत करुन घेण्याची जबाबदारी संबधित अधिकाऱ्याची राहील.

## “Fiber-Reinforced Polymer (FRP) Toilet” तंत्रज्ञानाचा वापर करुन शौचालयाचा पुरवठा व उभारणी करणेसाठीचे कामकाज आदेश

**या कार्यालयाचे पुरवठा आदेश क्र. एबाविसेयो/का-७/ FRP-Toilet /२०२५/ ५२०**

**दि. ३१/७/२०२५**

| अ.क्र. | जिल्हयाचे नांव | जिल्हास्तरावरुन प्राप्त माहितीनुसार स्वमालकीच्या अंगणवाडी केंद्रामध्ये शौचालय नसलेल्या अंगणवाडी केंद्राची एकुण संख्या | त्यापैकी या आदेशान्वये **मे. माविन अधेसिव्ह प्रा.लि., पुणे** यांनी FRP शौचालयाचा पुरवठा व उभारणी करणेसाठीची एकुण अंगणवाडी केंद्राची संख्या |
|---|---|---|---|
| १ | अहिल्यानगर (अहमदनगर) | २७३ | २७३ |
| २ | अकोला | ५०४ | ५०४ |
| ३ | अमरावती | ३७४ | ३७४ |
| ४ | छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | १८७ | ० |
| ५ | बीड | ४४३ | ० |
| ६ | भंडारा | १०६ | ० |
| ७ | बुलढाणा | ३०३ | ० |
| ८ | चंद्रपुर | २२३ | १९६ |
| ९ | धुळे | २६६ | ० |
| १० | गडचिरोली | १६७ | ० |
| ११ | गोंदिया | २१६ | ० |
| १२ | हिंगोली | १०८ | ० |
| १३ | जळगांव | ३३३ | ० |
| १४ | जालना | ८० | ० |
| १५ | कोल्हापूर | १४९ | १४९ |
| १६ | लातूर | ५६ | ० |
| १७ | नागपूर | ११४ | ० |
| १८ | नांदेड | १८३४ | ० |
| १९ | नंदुरबार | ८५८ | ० |
| २० | नाशिक | १६५ | ० |
| २१ | धाराशिव (उस्मानाबाद) | २१६ | ० |
| २२ | पालघर | ९९ | ० |
| २३ | परभणी | ४६९ | ० |
| २४ | पुणे | ९७ | ९७ |

| अ.क्र. | जिल्हयाचे नांव | जिल्हास्तरावरुन प्राप्त माहितीनुसार स्वमालकीच्या अंगणवाडी केंद्रामध्ये शौचालय नसलेल्या अंगणवाडी केंद्राची एकुण संख्या | त्यापैकी या आदेशान्वये **मे. माविन अधेसिव्ह प्रा.लि., पुणे** यांनी FRP शौचालयाचा पुरवठा व उभारणी करणेसाठीची एकुण अंगणवाडी केंद्राची संख्या |
|---|---|---|---|
| २५ | रायगड | ७३ | ० |
| २६ | रत्नागिरी | ० | ० |
| २७ | सांगली | ७६ | ७६ |
| २८ | सातारा | ४२४ | ४२४ |
| २९ | सिंधुदूर्ग | ५ | ५ |
| ३० | सोलापूर | २७२ | २७२ |
| ३१ | ठाणे | ६४ | ० |
| ३२ | वर्धा | ७६ | ० |
| ३३ | वाशिम | १८३ | ० |
| ३४ | यवतमाळ | ८५१ | ८५१ |
| | **एकुण पुरवठयाची संख्या** | **९६६४** | **३२२१** |

**(कैलास पगारे, भाप्रसे)**
आयुक्त,
एकात्मिक बाल विकास सेवा योजना,
महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई

# COMMISSIONERATE OF INTEGRATED CHILD DEVELOPMENT SERVICES SCHEME, MAHARASHTRA STATE, NAVI MUMBAI
## (WOMEN & CHILD DEVELOPOMENT DEPARTMENT)
## LIST OF DPO INFORMATION

| Sr. No. | District Name | Full Name of District Project Officer | Designation | Mobile No. | Office Email ID |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Ahmednagar | Manoj Madhavrao Sase | District Programme Officer | 9890121111 | cwdyceo.anr@gmail.com |
| 2 | Akola | Rajshri madhukarao kolkhede | District Programme Officer | 9421836600 | akolaicds@gmail.com |
| 3 | Amaravati | Marsale Vilas | District Programme Officer | 9860936943 | dyceobalkalyan@gmail.com |
| 4 | Aurangabad | Suvarna Jadhav | District Programme Officer | 9373313350 | icdszpabd@gmail.com |
| 5 | Beed | Kailas Bade | District Programme Officer | 7588178980 | dyceocw@yahoo.com |
| 6 | Bhandara | sanjay zole | District Programme Officer | 9860314737 | dyceocdzpbhandara@gmail.com |
| 7 | Buldhana | Pramod Shrirang Yendole | District Programme Officer | 8551019182 | dyceocwzpbuldana@gmail.com |
| 8 | Chandrapur | Bhagavt Tambe | District Programme Officer | 9970076671 | dyceobkzpchandrapur@gmail.com |
| 9 | Dhule | Ajay Fadol | District Programme Officer | 9518908569 | dyceo.icdsdhule@gmail.com |
| 10 | Gadchiroli | Archana Ingole | District Programme Officer | 9011294251 | icdscellgad@gmail.com |
| 11 | Gondia | Kirti kumar katare | District Programme Officer | 8087977288 | Dyceowcdzpgondia@gmail.com |
| 12 | Hingoli | Ganesh Wagh | District Programme Officer | 9923040733 | mbkicdshng@gmail.com |
| 13 | Jalgaon | Hemantro Bajirao Bhadane | District Programme Officer | 7588813310 | dyceocwzp@gmail.com |
| 14 | Jalna | Komal Kore -Chate | District Programme Officer | 9960368144 | icdszpjalna@gmail.com |
| 15 | Kolhapur | Shilpa Vishwas Patil | District Programme Officer | 9423044648 | dyceocwkop@gmail.com |
| 16 | Latur | Shaikh Jawed Salamtulla | District Programme Officer | 8275448579 | dyceoicdslatur@gmail.com |
| 17 | Nagpur | Kailas Ghodke | District Programme Officer | 8275387719 | icdszpnagpur@yahoo.co.in |
| 18 | Nanded | Prashant Thorat | District Programme Officer | 7588564994 | dyceoicdsnanded@gmail.com |
| 19 | Nandurbar | Krishna Fulsing rathod | District Programme Officer | 7776952211 | icdszpndb@gmail.com |
| 20 | Nashik | Pratap Patil | District Programme Officer | 8691061230 | icdszpnsk@rediffmail.com |
| 21 | Osmanabad | D.M Giri | District Programme Officer | 9823102399 | dyceo.cwdosmanabad@gmail.com |
| 22 | Palghar | Pravin bhavsar | District Programme Officer | 9653660408 | Wcdpalgharzp1@gmail.com |
| 23 | Parbhani | Rekha p. Kalam | District Programme Officer | 9561924373 | dyceogzppbn@gmail.com |
| 24 | Pune | J. B. Girase | District Programme Officer | 8149467407 | mbkzppune01@gmail.com |
| 25 | Raigad | Nirmala Kuchik | District Programme Officer | 8888849490 | icdszpraigad@yahoo.co.in |
| 26 | Ratnagiri | Shrikant D. Hawale | District Programme Officer | 9767557167 | mbkrtn@gmail.com |
| 27 | Sangli | Sandeep Sambhaji Yadav | District Programme Officer | 7745078078 | icdsdyceo@gmail.com |
| 28 | Satara | Rohini Dhavale | District Programme Officer | 8007556049 | dyceozpsatara@gmail.com |
| 29 | Sindhudurg | Somantha Rasal | District Programme Officer | 9175044909 | icds.sindhudurg@rediffmail.com |
| 30 | Solapur | Prasad Mirkale | District Programme Officer | 8275255471 | dyceocwsolapur@gmail.com |
| 31 | Thane | Sanjay Chabilal Bagul | District Programme Officer | 9967282382 | cwdzp169.thane@gmail.com |
| 32 | Wardha | Manisha Kurasnge | District Programme Officer | 9527344729 | dyceowardha@gmail.com |
| 33 | Washim | Sanjay Dhanraj Ganvir | District Programme Officer | 9421577403 | Icdszpwashim@gmail.com |
| 34 | Yavatmal | Vilas Jadhav | District Programme Officer | 8275329887 | icdszp_yavt@rediffmail.com |